# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः13.12.2024** **वारःशुक्रवार**

---

1. लोकसभेत आज आणि उद्या संविधानावर चर्चा
2. अदानी समूह लाचखोरी आणि सोरोस प्रकरणावरून संसदेत पुन्हा गदारोळ, राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब
3. रस्ते अपघातातल्या जखमींना दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचार रोखरहित पद्धतीनं उपलब्ध करून देण्यासंबंधीची योजना लवकरच सुरू होणार- रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची माहिती
4. गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी राज्य सरकार नवीन कक्षाची स्थापना करणार आणि
5. भारताचा 18 वर्षीय ग्रँडमास्टर डी. गुकेशनं फिडे बुद्धिबळ स्पर्धेचं विजेतेपद पटकावत रचला इतिहास. जगज्जेतेपदाचा सर्वात युवा मानकरी.

**<u>लोकसभा चर्चा</u>**

देशानं राज्यघटना स्वीकारली त्या घटनेला 75 वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त लोकसभेत आजपासून दोन दिवस त्यावर विशेष चर्चा होणार आहे. प्रश्नोत्तराच्या तासानंतर या चर्चेला सुरुवात होईल. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह संविधानावरील या चर्चेची सुरुवात करतील. नंतर विविध पक्षांचे नेते दोन दिवस त्यावर सभागृहात आपले विचार मांडतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या यावरील चर्चेला उत्तर देणार आहेत. राज्यसभेत 16 आणि 17 तारखेला संविधानावर चर्चा होणार आहे. या विशेष चर्चेच्या अनुषंगानं काल पंतप्रधानांनी भाजपचे अध्यक्ष जे. पी नड्डा, अमित शहा यांच्यासह पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसमवेत धोरणात्मक बैठक घेतली. हिवाळी अधिवेशनात संविधानावर चर्चा घ्यावी अशी विरोधी पक्षांची प्रमुख मागणी होती

**<u>संसद कामकाज</u>**

दरम्यान अदानी समुहाचं कथित लाचखोरी प्रकरण आणि काँग्रेस नेत्यांचे अमेरिकेतील जॉर्ज सोरोस फाउंडेशनशी असलेले संबंध या मुद्यांवरून विरोधक आणि सत्ताधारी बाकांवरील खासदारांनी परस्परांवर केलेले आरोप-प्रत्यारोप आणि शाब्दिक खडाजंगीमुळे झालेल्या गोंधळामुळे राज्यसभेचं कामकाज काल आधी दोन वेळा आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेतही पहिल्या सत्रात अदानी समूह आणि सोरोस प्रकरणावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. त्यामुळे लोकसभेचं कामकाजही दोन वेळा तहकूब करावं लागलं. मात्र मधल्या सुटीनंतर सभागृहाचं कामकाज सुरळितपणे सुरू झालं.

**<u>गडकरी</u>**

रस्ते अपघातातल्या जखमींवर उपचारासाठी देशभरात लवकरच रोखरहित उपचारसेवा सुरू करणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नीतीन गडकरी यांनी काल लोकसभेत प्रश्नोत्तरांच्या तासात दिली. या योजनेअंतर्गत रस्ते अपघातात जखमी झालेल्यांना दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचार रोखरहित पद्धतीनं घेता येऊ शकतील असं गडकरी यांनी सांगितलं. या योजनेबद्दल अधिक माहिती देताना ते म्हणाले.....

**<u>प्रार्थनास्थळ आदेश</u>**

प्रार्थनास्थळ कायद्याअंतर्गत नवीन खटले दाखल करून घेतले जाऊ नयेत असा आदेश काल सर्वोच्च न्यायालयानं दिला. तसंच याच्याशी संबंधित प्रलंबित खटल्याप्रकरणी पुढील आदेशापर्यंत कोणतेही अंतिम आदेश देऊ नयेत, असंही न्यायालयानं सांगितलं आहे. प्रार्थनास्थळ कायदा 1991 च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर चार आठवड्यात उत्तर

द्यावं असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखालच्या विशेष पीठानं सांगितलं आहे. या कायद्यानुसार 15 ऑगस्ट 1947 नंतर कोणत्याही प्रार्थनास्थळामधे बदल करायला मनाई करण्यात आली आहे.

**मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी फडणवीस यांनी त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची अश्वारूढ मूर्ती भेट दिली. या भेटीबद्दल माध्यमांच्या प्रतिनिधींना माहिती देताना ते म्हणाले.....

**गुंतवणूक योजना**

देश परदेशातील गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात गुंतवणुकीकरिता आकर्षित करण्यासाठी राज्य शासनामार्फत आता विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. देशातील तसेच परदेशी गुंतवणुकीसाठी गुंतवणूकदारांच्या प्रस्तावांवर त्यांना सल्ला आणि मदत देण्यासाठी विशेष कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. नवीन गुंतवणुकीसाठी जागतिक आणि प्रादेशिक गुंतवणूक व्यापारासह सुसंगत धोरण तयार करण्यावर भर दिला जाणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं.

**दानवे परभणी**

परभणी जिल्हयात शांतता, कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली काल जिल्हा शांतता समितीची बैठक पार पडली. यावेळी उपस्थित सर्वांनी जिल्ह्यात शांतता, कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा आणि पोलीस प्रशासनाला पूर्णपणे सहकार्य करण्याचे आश्वासन दिलं. दरम्यान परभणीमधल्या संविधानाच्या प्रतिकृतीच्या अवमान प्रकरणी विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी काल परभणीला भेट देऊन पाहणी केली.

**संविधान अवमान-वाशीम**

दरम्यान संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या समाजकंटकावर शासनाने देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी काल वाशिम इथल्या आंबेडकरी समाजाच्या शिष्टमंडळानं जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. या शिष्टमंडळानं जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना या मागणीचं निवेदन दिलं.

**जयगड वायुगळती-रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या जयगडमध्ये काल दुपारी झालेल्या वायुगळतीमुळे एकंदर 58 जणांना त्रास झाला असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सर्व व्यक्तींची प्रकृती स्थिर असून, त्यांना आज रुग्णालयातून घरी पाठवण्यात येईल, अशी माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली. बाधित 58 जणांमध्ये पाच विद्यार्थी, 52 विद्यार्थिनी आणि एका महिलेचा समावेश आहे. जिंदाल कंपनीच्या जेएसडब्ल्यू बंदरात नियमित देखभाल-दुरुस्तीचं काम सुरू असताना दुपारी इथिल मरकॅप्टन या वायूची थोड्या प्रमाणात गळती झाली. त्यामुळे जयगडमधलं माध्यमिक विद्यालय आणि कला, वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय इथल्या विद्यार्थ्यांना त्याचा त्रास झाल्याची माहिती अपर जिल्हाधिकारी शंकर बर्गे यांनी दिली.

**अपार-सिंधुदुर्ग**

'एक देश एक विद्यार्थी ओळख' या संकल्पनेतून राबवण्यात येणाऱ्या 'अपार' नोंदणीत सिंधुदुर्ग जिल्ह्यानं राज्यात पहिला क्रमांक राखला आहे. अहिल्यानगर जिल्हा दुसऱ्या स्थानावर तर रत्नागिरी जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात 8 लाख 19 हजार 95 विद्यार्थ्यांची म्हणजेच 90 टक्क्यांहून अधिक 'अपार' नोंदणी पूर्ण झाली आहे.

**वटवाघळं-सांगली**

सांगली जिल्ह्यात तासगाव तालुक्यातील मांजर्डे इथल्या एका शेतकऱ्याची अडीच एकर क्षेत्रावरील विक्रीस तयार असलेली द्राक्ष बाग वटवाघळांनी फस्त केल्यामुळे लाखो रुपयांचं नुकसान झालं आहे. प्रशासनानं या घटनेचा पंचनामा केला असून भरपाई मिळावी अशी मागणी संबंधित द्राक्ष बागायतदारानं केली आहे.

**<u>अपघात-हिंगोली</u>**

हिंगोली ते कळमनुरी महामार्गावर काल कळमनुरी शिवारात हैदराबाद येथून उज्जैन कडे जाणाऱ्या भाविकांची कार उलटून झालेल्या अपघातात मायलेकीचा मृत्यू झाला आहे. तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. कुत्र्याला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला

**<u>बुद्धिबळ</u>**

भारताचा 18 वर्षीय ग्रँडमास्टर डोम्माराजू गुकेश बुद्धिबळाच्या इतिहासातील सर्वात कमी वयाचा जगज्जेता बनला आहे. सिंगापूरमध्ये झालेल्या फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या 14व्या आणि अंतिम फेरीत गुकेशनं काल चीनच्या डिंग लिरेवर मात करत 18व्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेचं विजेतेपद मिळवून इतिहास रचला. ऐकुया त्याबाबतचा वृत्तांत...

**अत्यंत चुरशीने सुरू असलेल्या लढतीच्या पाचव्या तासात गुकेशनं विजयश्री खेचून आणली. डिंगने 55 व्या चालीमध्ये केलेली एक चूक; काळ्या मोहऱ्यानी खेळणाऱ्या गुकेशच्या पथ्यावर पडली, आणि प्रतिस्पर्ध्यावर दडपण टाकण्याची संधी अजिबात न गमावता त्यानं हा मानाचा मुकुट पटकावला. गुकेश आणि डिंग या दोघांमध्ये विजेतपदासाठी लढतीच्या एकंदर 14 फेऱ्या झाल्या. त्यापैकी तीन फेऱ्या गुकेशनं तर दोन डिंगनं जिंकल्या, 9 फेऱ्या अनिर्णित राहिल्या, अखेरच्या फेरीत गुकेशनं डिंगला चेकमेट करत साडेसात गुणांसह हे ऐतिहासिक यश प्राप्त केलं. गुकेशच्या या यशाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. त्यानं मिळवलेल्या या जेतेपदामुळे बुद्धिबळाचं ऊर्जा केंद्र म्हणून असलेलं भारताचं वर्चस्व सिद्ध झाल्याचं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरील अभिनंदनाच्या संदेशात म्हटलं आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी प्रशांत जाधव, पुणे**

**<u>मुख्यमंत्री</u>**

जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत विश्वविजेतेपद पटकावणाऱ्या डी. गुकेशचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अभिनंदन केलं आहे.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली असून मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली आहे. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.